# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( महाराष्ट्र शासकीय उपक्रम.)

CIN -U45200MH1974SGC17206

पंजीकृत कार्यालय - एफडीसीएम भवन,३५९ /बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपुर -४०० ०३६

विभागीय कार्यालय - विभागीय व्यवस्थापक, वनप्रकल्प विभाग, टाणे यांचे कार्यालय,

बंगला नं.९ अ, बारा बंगला, कोपरी टाणे पुर्व - ४००६०३ दुरध्वनी -०२२-२५३२१६८६


## जाहीर निविदा सुचना

वन प्रकल्प विभाग,ठाणे अंतर्गत टर्न-की कार्यकेंद्रामार्फत एन.एच.एस.आर.सी.एल यांचेकरीता मौजे,आंबिवली सर्व्हे नं.२५/२ ता.कल्याण येथे रोपवन करणेकामी ८८० नर्सरी रोपांचा वाहतुकी व भराई/ उतराई सह पुरवठा करणे आवश्यक असल्याने इच्छुक नर्सरी धारक, पुरवठाधारक यांचेकडून नर्सरी रोपे पुरवटाकामी निविदा दि.१४.०६.२०२४ ते दि.२६.०६.२०२४ दुपारी १.०० वाजेपर्यंत ऑफलाईन पध्दतीच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

आवश्यक असलेल्या रोपांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रजातीचे नाव | आवश्यक संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शिसव-३००, करंज-१५०, तामण (जारूळ)- १५०, कदंब-१००, सावर-१००, बाहवा- ८० | ८८० | ६ ते ८ फुट उंच व १५x१२ किंवा १५x१६ इंच पिशवीत असलेली सुदृढ रोपे |

अधिक माहीतीकरीता वरील कार्यालयास तसेच www.fdcm.nic.in संकेतस्थळावर संपर्क साधावा.

विभागीय व्यवस्थापक,
वन प्रकल्प विभाग,ठाणे

**फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड**

( महाराष्ट्र शासकीय उपक्रम.)

CIN -U45200MH1974SGC17206

पंजीकृत कार्यालय - एफडीसीएम भवन,३५९ /बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपुर -४०० ०३६

विभागीय कार्यालय - विभागीय व्यवस्थापक, वनप्रकल्प विभाग, ठाणे यांचे कार्यालय,

बंगला नं.९ अ, बारा बंगला, कोपरी ठाणे पुर्व - ४००६०३ दुरध्वनी -०२२-२५३२९६८६

## जाहीर निविदा सुचना (अल्प मुदत)

वन प्रकल्प विभाग,ठाणे अंतर्गत टर्न-की कार्यकेंद्रामार्फत एन.एच.एस.आर.सी.एल यांचेकरीता मौजे,आंबिवली सर्व्हे नं.२५/२ ता.कल्याण येथे रोपवन करणेकामी ८८० नर्सरी रोपांचा वाहतुकीसह पुरवठा करणे आवश्यक असल्याने इच्छुक नर्सरी धारक, पुरवठाधारक यांचेकडून नर्सरी रोपे पुरवठाकामी दि.१४.०६.२०२४ ते दि.२६.०६.२०२४ दुपारी १.०० वाजेपर्यंत ऑफलाईन पध्दतीच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

| **तपशिल** | **दिनांक व वेळ** |
|---|---|
| निविदा फॉर्म विक्री तारीख | दि.१४.०६.२०२४ ते दि.२६.०६.२०२४ दुपारी १.०० वाजपर्यंत |
| निविदा भरावयाची अंतिम तारीख | दि.१४.०६.२०२४ ते दि.२६.०६.२०२४ दुपारी २.०० वाजपर्यंत |
| निविदा उघडण्याची तारीख | दि.२६.०६.२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता (शक्य झाल्यास) |
| निविदाची फॉर्म फी | रु.५९०/- (GST सह) |
| अनामत रक्कम (ऑफलाईन) | ४४००/- |

विभागीय व्यवस्थापक,
वनप्रकल्प विभाग,ठाणे

## निविदांबाबत सूचना

१. यशस्वी निविदाधारकाने निविदेच्या (सुरक्षा) ५% रक्कम विहित मुदतीत रोपे पुरवठा होईपर्यंत या कार्यालयाकडे बिनव्याजी जमा राहील त्यावर कोणतेही व्याज मिळणार नाही.
२. निविदा धारकास रोपे पुरवठा करण्याबाबत दिलेल्या अटी व शर्तो व्यतिरिक्त कोणतीही अट व शर्त घालता येणार नाही. अशी निविदा सशर्त समजून नाकारण्यास पात्र राहील.
३. निविदा धारकाची स्वत:ची नर्सरी/रोपवाटीका असणे आवश्यक आहे. व त्यांनीच निविदा भरावयाची आहे रोपवाटीका जर कंपनी कर्मचाऱ्याच्या नावे असल्यास निविदा सोबत पॉवर ऑफ ॲटर्नीची प्रत जोडणे आवश्यक आहे. अशी प्रत न जोडल्यास सदर निविदा नाकारण्याचा अधिकार विभागीय व्यवस्थापक,ठाणे यांना राहील. निविदा मंजूर झाल्यास पॉवर ऑफ ॲटर्नीची मुळप्रत आवश्यक वाटल्यास नंतर पडताळून पाहण्यात येईल.
४. निविदा भरल्यानंतर त्या मंजूर होईपर्यंत निविदांचे दरात कोणतेही बल करता येणार नाही अथवा निविदा मागेही घेण्यात येणार नाही. निविदेतील दर रोपे पुरवठ्याचे काम पुर्ण होईपर्यंतचे १ वर्ष कालावधीपर्यंत बंधनकारक राहतील.
५. कोणतीही निविदा मंजूर करणे अथवा नामंजुर करणे अथवा अंशत: मंजूर करणे हे विभागीय व्यवस्थापक, ठाणे यांच्या अखत्यारित राहील. त्या बद्दल कोणतेही कारण देण्यांत येणार नाही. अथवा विभागीय व्यवस्थापक, ठाणे यांच्या निर्णयावर कोणताही वाद निर्माण करता येणार नाही.
६. निविदा मंजूर होताच नियमाप्रमाणे स्टँप पेपरवर अटी व शर्तो प्रमाणे करारनामा करावा लागेल व त्यासाठी स्टँप पेपर यशस्वी निविदाधारकाने आणून करारनामा करावयाचे.
७. निविदा भरतांना निविदाधारकाने पुढील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
   अ. मागील तीन वर्षाचे आयकर विवरण पत्र.
   ब. जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र.
   क. पॅनकार्ड व आधारकार्ड
   ड. शासकिय/निमशासकिय विभाग/संस्थेला रोपे पुरवठा केल्या बाबतचा दाखला.
   ई. रोपांचे/ नर्सरी चे जिओटॅग फोटो सादर करणे.
   उ. नर्सरी नोंदणी प्रमाणपत्र/स्थानिक स्वराज्य संस्था यांचे परवानगीचे पत्र.
   ऊ. निविदेत दर्शविल्याप्रमाणे १०० टक्के रोपांचा साठा उपलब्ध असल्याबाबतचा प्रजातीनिहाय दाखला/प्रमाणपत्र.
८. कामाचे पुरवठा आदेश वरीष्ठ कार्यालयाचे मंजूरी व अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून देण्यात येईल.
९. निविदाधारकाने रोपे पुरवठा स्थळ प्रत्यक्ष पाहून तसे प्रमाणपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी,टर्न-की यांचेकडून घ्यावे. नंतर कोणतीही बाब तक्रार गृहीत धरण्यात येणार नाही.

## रोपे पुरवठा करण्याच्या अटी व शर्ती:-

१. ८८० रोपांचा पुरवठा सोबत दिलेल्या प्रजाती नुसार करावा लागणार आहे. मागणीनुसार रोपांची व प्रजातींची संख्या कमी जास्त होऊ शकते.

२. रोपांच्या पिशवीचे आकारमान कमीत कमी १५x१२ से.मी किंवा १५x१६ असे असावे व रोपांची कमीत कमी उंची ६ ते ८ फुट असावी. रोपांच्या उंचीत पिशवीची उंची गृहीत धरली जाणार नाही. रोपे कमीत कमी दोन-तीन वर्षे जुनी व रोपांच्या बुडाजवळील वेढी २ ते ३ इंच पर्यंत असणे आवश्यक आहे. रोपांचा शेंडा तुटलेला नसावा पानांची पानगळ झालेली नसावी.

३. रोप सरळ वाढलेले असावे, वेडे वाकडे वाढलेले रोप स्विकारले जाणार नाही.

४. सोबत दिलेल्या यादीप्रमाणेच रोपांचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. तसेच रोपे पाठविताना नर्सरीमधील फोटो सादर करणे आवश्यक आहे.

५. रोपांची किंमत प्रती रोप देण्यांत यावी. त्यात सर्व प्रकारचे कर व GST सहीत व वाहतूकीचा दर (विविध रोपे लागवडीच्या स्थळापर्यंत भराई-उताराईसह) समावेश असावा.

६. निविदाधारकाने रोपे पुरवठा स्थळ प्रत्यक्ष पाहून तसे प्रमाणपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी,टर्न-की यांचेकडून घ्यावे नंतर कोणतीही बाब तक्रार गृहीत धरण्यात येणार नाही.

७. निविदा स्विकारल्यानंतर आवश्यक तेवढया रोपांचा पुरवठा १० दिवसांच्या आत करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत रोपे पुरवठा स्विकारणे अथवा नाकारणे हे विभागीय व्यवस्थापक, ठाणे यांच्या अखत्यारीत राहील. मंजूर झालेले दर हे एक वर्ष कालावधीसाठी लागू राहतील व या कालावधीत याच दराने रोपे पुरवठा करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

८. ज्या निविदाधारकांची निविदा मंजूर होईल, त्यांच्या रोपवाटीकेतील रोपांची पाहणी या कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून करण्यांत येईल व निरोगी व सुदृढ योग्य उंचीच्या रोपांची निवड करतील. निवड केलेल्या रोपांचाच पुरवठा करावा लागेल. रोपे उंच असल्याने त्यांना काठी असणे आवश्यक आहे.

९. विभागीय व्यवस्थापक, ठाणे यांना आवश्यक असल्यास मुदतवाढ देण्याचा अधिकार राहील.

१०. रोपे पुरवठा हा वेळुनुसार व आवश्यकते नुसारच या कार्यालयाच्या सुचनेप्रमाणे करावा लागेल.

११. वरील रोपे पुरवठा यशस्वी मक्तेदाराने/निविदा धारकाने ठरवून दिलेल्या वेळेत अथवा विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, ठाणे व त्यांचे प्रतिनिधी हे सांगतील त्याप्रमाणे वेळेत केला नाही तर त्यांनी अनामत पोटी जमा केलेली रक्कम जप्त करुन महामंडळात जमा करण्यांत येईल. याबाबत पुरवठादाराचे/निविदा धारकाचे कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

१२. निविदेमध्यें दिलेल्या परिमाणामध्यें कमी जास्त बदल होऊ शकतो व एफडीसीएम ठाणे वन प्रकल्प विभागाचे आवश्यकते नुसार रोपे पुरवठयाची मागणी केली जाईल व त्याप्रमाणे तितकाच पुरवठा पुरवठादाराने करावयाचा आहे. त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.

१३. रोपे पुरवठयाच्या बिलाचे शोधन करण्यासाठी मंजूरी निविदाधारकांनी स्वंस्पष्ट बिल,फोटो, रोपे पुरवठयाच्या चलनासह विभागीय व्यवस्थापक, ठाणे यांना सादर करावे. बिलासोबत जोडलेल्या प्रत्येक चलनावर जागेवर उपलब्ध असलेल्या वनरक्षक/वनपाल/वनपरीक्षेत्र अधिकारी यांची स्वाक्षरी घेवून बिल शोधनासाठी सादर करावे.

१४. यशस्वी निविदाधारक L-१ कडे योग्य गुणवत्तेचा आकारमान/प्रजातीचे योग्य रोपे उपलब्ध नसल्यास त्यांच्या मंजूर दराने इतर निविदा धारकांकडून रोपे उपलब्ध करून घेण्यात येतील.

१५. आवश्यक असलेली प्रजाती, गुणवत्ता व आकारमानाचे रोपे मंजुर निविदाधारकाकडे उपलब्ध नसल्यास त्यांचे जोखीम जबाबदारीवर त्यांचे मंजुर दरात इतर पुरवठाधारकाकडुन उपलब्ध करून घेण्यात येतील.

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड करीता

विभागीय व्यवस्थापक,
वनप्रकल्प विभाग, ठाणे.

---

वरील रोपे पुरवठया बाबतचा तपशिल तसेच अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

दिनांक :

निविदाधारकाचे नांव व सही.

# आवश्यक असलेल्या रोपांची माहीती

| अ.क्र | प्रजाती | संख्या |
| --- | --- | --- |
| १ | शिसव | ३०० |
| २ | करंज | १५० |
| ३ | तामण (जारूळ) | १५० |
| ४ | कदंब | १०० |
| ५ | सावर | १०० |
| ६ | बाहवा | ८० |
| | एकुण | ८८० |

विभागीय व्यवस्थापक,
वनप्रकल्प विभाग, ठाणे.